# PSI-STI-ASO - मुख्य परीक्षा - 2020
## पेपर 1
## मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

1. **'शिपायाकडून चोर धरला जातो' या वाक्यातील प्रयोग ओळखा.**
(1) कर्तरी (2) कर्मणी
(3) नवीन कर्मणी (4) भावे

2. **'एका शब्दात दुसरा शब्द मिसळून नवीन शब्द तयार होतात' हा शब्दसिद्धिचा कोणता प्रकार आहे ?**
(1) समास (2) उपसर्गघटित
(3) प्रत्ययघटित (4) अभ्यस्त

3. **ज्याचा अपकर्ष व्हावयाचा असतो त्याची वाईट गोष्टीकडे प्रवृत्ती आपोआप जाते. म्हणून म्हणतात ना ........ हेच खरं! रिकाम्या जागी योग्य म्हण कोणती ?**
(1) भित्याच्या पाठीस ब्रह्मराक्षस
(2) भांडणांचे तोंड काळे
(3) बुडत्याचा पाय खोलात
(4) दात कोरून पोट भरणे

4. **'माझे नुकतेच जेवण झाले होते पण वेदांशच्या आग्रहामुळे मी <u>थोडा आहार घेतला</u>.' अधोरेखित वाक्यांशासाठी योग्य वाक्प्रचार**
(1) तोंड घालणे. (2) तोंड काळे करणे.
(3) तोंड उष्टे करणे. (4) तोंडसुख घेणे.

5. **शब्दसिद्धी प्रकारात प्रत्यय जेव्हा शब्दापूर्वी येतो तेव्हा त्याला व्याकरणात काय म्हणून संबोधतात ?**
(1) अभिकरण (2) उपसर्ग
(3) विकरण (4) प्रत्ययघटित

6. **'सदाचार' या जोडशब्दात एकम आलेली व्यंजनसंधी ओळखा.**
(1) सत् + आचार (2) सद् + आचार
(3) सदा + चार (4) सच् + आचार

7. **''रस्त्यावरून जाताना सावकाश व जपून चालावे,'' या विधानातील 'सावकाश' शब्दावरून कोणत्या अव्ययाचा बोध होतो ?**
अ. कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
ब. स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय
क. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय
ड. प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

8. **'आज जी संपत्ती त्याजपाशी आहे, ती त्याने स्वतःच्या पराक्रमावर आपल्या हयातीतच मिळवली आहे.' या वाक्याचा प्रकार आहे.**
(1) संयुक्त वाक्य
(2) मिश्र वाक्य
(3) प्रश्नार्थक वाक्य
(4) यापैकी कोणताच पर्याय बरोबर नाही

9. **मराठी वर्णमालेतील 'ह्रस्व स्वर' असलेला पुढीलपैकी योग्य गट कोणता ?**
(1) अ, आ, ई (2) इ, ई, ऊ
(3) ए, ओ, औ (4) अ, इ, उ

10. **बाग, मजा, ढेकर या शब्दांचे लिंग कोणते ?**
(1) पुल्लिंगी (2) स्त्रीलिंगी
(3) पुल्लिंगी व स्त्रीलिंगी (4) नपुसकलिंगी

11. **'सुधा' या शब्दाचा पर्यायी शब्द ओळखा.**
अ. नदी ब. पीयूष
क. समुद्र ड. तलाव
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

12. **सामान्यरूप होताना पुढीलपैकी कोणत्या शब्दाच्या रूपात विकृती होते ?**
(1) लिंबू (2) कवी
(3) दासी (4) चाकू

13. **स्वरमालेतील 'अं आणि अः' या दोन वर्णांना काय म्हणतात ?**
(1) संयुक्त स्वर (2) स्वरादी
(3) दीर्घ स्वर (4) परवर्ण स्वर

**14. 'स्पर्धेत गुणानुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, असे स्पर्धक निवडले जातील.' अधोरेखित शब्दांचा विशेषण प्रकार ओळखा.**

(1) क्रमवाचक विशेषणे
(2) आवृत्तीवाचक विशेषणे
(3) पृथकत्ववाचक विशेषणे
(4) गुण विशेषणे

**15. मला यातलं काही विचारु नका, या विधानाचा प्रकार ओळखा.**

अ. प्रश्नार्थी वाक्य ब. संकेतार्थी वाक्य
क. विधानार्थी वाक्य ड. आज्ञार्थी वाक्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**16. 'समीप' या क्रियाविशेषणाचा प्रकार ......**

(1) क्षणवाचक
(2) गतिदर्शक
(3) स्थितीदर्शक
(4) वरील सर्व पर्याय चूक आहेत

**17. 'श्, ष, स, ह' ही व्यंजने कोणत्या उच्चार प्रकारातील आहेत.**

(1) उष्मे (2) अन्तस्थ
(3) कंठौष्ठ्य (4) दंततालव्य

**18. पुढीलपैकी 'प्रयोजक क्रियापद' असलेले योग्य वाक्य ओळखा.**

(1) मी चालतो.
(2) माझ्याकडून चालवले जाते.
(3) आई मुलाला चालवते.
(4) आईने मुलाला चालवले.

**19. ''आईवडिलांनी मुलांना मायेने वाढविले,'' या विधानातील क्रियापदावरून प्रयोग ओळखा.**

अ. भावे प्रयोग
ब. कर्मणी प्रयोग
क. कर्तरी प्रयोग
ड. अकर्मक कर्तरी प्रयोग

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**20. शकूचा नवरा म्हणजे भोळा सांब आहे. या वाक्यातील सामान्यनाम ओळखा.**

(1) शकू (2) भोळा
(3) सांब (4) नवरा

**21. 'अननस' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे ?**

(1) फार्शी (2) कानडी
(3) पोर्तुगीज (4) कोकणी

**22. 'दुःखामुळे सोडलेला दीर्घ श्वास' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता ?**

(1) हतबलता (2) तिरस्कार
(3) सुस्कारा (4) उ : श्वास

**23. ''पाखरे घरटी बांधतात,'' या विधानातील क्रियापदावरून प्रयोग ओळखा.**

अ. अकर्मक कर्तरी प्रयोग ब. कर्मणी प्रयोग
क. भावे प्रयोग ड. सकर्मक कर्तरी प्रयोग

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**24. 'तिरस्कार' या शब्दाच्या संधीची फोड**

(1) तिर: + कार (2) तिः + रस्कार
(3) तिर + स्कार (4) तिरस्का + र

**25. 'एक रुपयास दोन चिकू मिळतात.' या विधानातील अधोरेखित शब्दातील 'स' हा चतुर्थीचा प्रत्यय कोणता अर्थ सूचित करतो ?**

(1) सामीप्य (2) हेतू
(3) मूल्य (4) मर्यादा

**26. 'कन्या' या शब्दासाठी समानार्थी योग्य शब्द कोणता ?**

(1) तनया (2) रजनी (3) शर्वरी (4) सुत

**27. चोर सोडून संन्याशाला फाशी देऊन चालणार नाही, या विधानाचे प्रश्नार्थक रूपांतर काय होईल ?**

अ. चोर सोडून संन्याशाला फाशी ?
ब. चोर सोडून संन्याशाला फाशी देता येत नाही ?
क. चोर सोडून संन्याशाला फाशी देऊन चालते का ?
ड. चोर सोडून संन्याशाला फाशी देऊन कसं चालेल ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**28. 'चला ! आता विडा द्या.' या वाक्यातील शब्दशक्ती ओळखा.**
(1) अभिधा
(2) लक्षणा
(3) व्यंजना
(4) यापैकी एकही नाही

**29. 'संत भक्तीने देवाला वश करतात' या वाक्यातील अधोरेखित शब्दातील नाम प्रकार ओळखा.**
(1) विशेषनाम (2) सामान्यनाम
(3) भाववाचकनाम (4) भक्तीनाम

**30. 'सलगी' चा विरुद्धार्थी शब्द कोणता ?**
(1) असमाधान (2) जवळीक
(3) दुरावा (4) सजनी

**31. मागून आला नि तिखट झाला, हे विधान कोणत्या विशेषण प्रकारातील आहे ?**
अ. अव्ययसाधित विशेषणे
ब. सर्वनामसाधित विशेषणे
क. नामसाधित विशेषणे
ड. धातुसाधित विशेषणे
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**32. ...... हा शब्द प्रत्ययघटित नाही.**
(1) आकर्ण (2) चराई
(3) खोदाई (4) घोटीव

**पुढील उतारा वाचून त्यावरील 33 ते 37 प्रश्नांची उत्तरे लीहा.**

एक जुनं प्रेमपत्र माझ्या वाचण्यात आलं. त्यातील प्रियकर आपल्या प्रियतमेला लिहितोय, 'आजचा दिवस हा समस्त विश्वातील पावित्र्याने आणि काव्याने भरलेला आणि भारलेला आहे. सगळ्या उत्सव, सणांनी भारलेला. वर्षभरातील 365 तेजस्वी सूर्य मी आज तुला अर्पण करतोय. या तुझ्या जन्मदिवशी, तुझ्या अवघ्या अस्तित्वाला या अर्धशतकातील अन् पुढच्या पूर्ण शतकातील सगळे सूर्य अर्पण ! सगळे ऋतू, सगळे रंग अन् सगळे सुगंध तुझ्या अस्तित्वाला अर्पण !'

पत्र वाचताना लक्षात येतं की प्रियतमेचा आज जन्मदिवस आहे. या अत्युत्कट प्रेमपत्राची तारीख आहे 31 ऑगस्ट 1967. पत्र लिहिणारा प्रेमी – प्रसिद्ध चित्रकार इमरोज. प्रियतमेचं नाव अमृता प्रीतम पंजाबी साहित्यातील स्त्रीचा दमदार आवाज म्हणजेच ज्ञानपीठ विजेत्या पद्मविभूषण अमृता प्रीतम! अमृताजी आज नाहीत. इमरोजजी आहेत. त्यांच्या जगावेगळ्या उत्कट प्रेमाबद्दलची पुस्तकं अन् कविता, आपल्याला एका विलक्षण, अद्भुत जगात घेऊन जातात.

हे पत्र वाचल्यानंतर मी इमरोजजींशी संवाद केला. विचारलं, '31 ऑगस्ट म्हणजे अमृताजींची जयंती. तुमच्या काय भावना आहेत आज?' प्रश्न पूर्ण न होऊ देताच ते उत्तरले – 'जयंती त्यांची, जे हयात नसतात. अमृता तर इथेच आहे. ती कुठे जाईल ? माझ्याशिवाय ती राहू शकत नाही. मी घरभर फुले मांडणार आहे. तिला फार आवडतात ना!' मी त्यांना त्यांचं 1967 चं प्रेमपत्र वाचलं हे सांगितलं. तेव्हाचं प्रेम, ती ओढ, याबद्दल आज काय वाटतं हे विचारलं. तर ते म्हणाले, प्रेम आणि त्याबद्दलची ओढ, उत्कटता कमी होतच नसते. आज तेव्हापेक्षा कितीतरी अधिक ओढ वाटते.' इमरोज म्हणजे अमृताच्या प्रेमाच्या शोधयात्रेत तिला मिळालेली अनमोल भेट! 45 वर्षांच्या प्रेमाच्या सहवासात त्यांनी कधीच एकमेकांना 'का?' असं विचारलं नाही. इमरोज म्हणतात, 'खरं प्रेम प्रश्न उभे करीत नाही.' अमृता कधीच इमरोजला सोडून जेवत नाही. इमरोज बाहेरून आले की अमृता गरम रोटी करणार. स्वयंपाकघरातील ओट्याजवळ इमरोजना उभे करून स्वतःच्या हाताने एक गरम रोटी खाऊ घालणार. उरलेलं जेवण दोघे पुन्हा डायनिंग टेबलजवळ करणार. हा क्रम 45 वर्षांच्या सहवासात कधी चुकला नाही. ती फार प्रेमळ व फारच साधी बाई. या अजरामर प्रेमकथेतील प्रसंग ऐकले, वाचले की वाटतं, प्रेमाचा खरा अर्थ केवळ त्यांनाच समजला आहे. अमृताजी संसद सदस्य होत्या. ती 6 वर्षे संसदेत त्यांना कारने सोडल्यावर इमरोज कारमध्ये बसून राहत; अगदी इतर खासदारांच्या ड्रायव्हरसारखे ! स्वत:च्या अस्तित्वाची दखल इतरांना घ्यायला लावण्याचा त्यांचा स्वभावच नाही. कुणा पुरुषानं इतकं निरहंकारी, निरपेक्ष प्रेम केलेलं मी तरी अद्याप पाहिलेलं नाही. स्त्रियांनी असे प्रेम केल्याचे दाखले बरेच सापडतात. इमरोज म्हणतात, 'प्रेम म्हणजे काय मला नाही ठाऊक, पण आमच्या नात्यात एकमेकांना समजून घेणं होतं. जोपर्यंत आपल्यातला 'मी' जागा आहे तोपर्यंत आपला जोडीदार हा एक दुसरा माणूस असतो. तू मी विरघळून 'आपण' झालो की अहंकार उरत नाही. मग वाद, प्रश्न, भांडणे कशी होणार ? स्त्रीला शरीराच्या पलीकडेही अस्तित्व असतं; पण खूपशा पुरुषांना हे कळतच नाही.

दोन सर्जनशील, उत्कट, कलावंतांचं सहजीवन इतकं विलोभनीय होतं! एवढं अनाग्रही निरहंकारी आणि सहज प्रेम करणारा हा पुरुष पाहून डोळे विस्फारून जातात.

**33. प्रियकराने आपल्या प्रियतमेला जन्मदिवशी कोणत्या शुभेच्छा दिल्या ?**
अ. वर्षभरातील 365 सूर्य तुला अर्पण करणार नाही.
ब. समस्त विश्व तुझ्या पावित्र्याने न भरो.

क. सारे ऋतु-रंग-सुगंध तुझ्या अस्तित्वाला अर्पण.

ड. तुला काव्यस्फूर्ति न लाभो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त क बरोबर

(3) फक्त ब आणि क बरोबर

(4) फक्त ड बरोबर बाकी चूक

**34. जयंती कोणाची साजरी केली जाते ?**

अ. जे हयात असतात त्यांची.

ब. जे जन्मास येणार आहेत त्यांची.

क. एखाद्याच्या जन्मदिवशी.

ड. एखाद्याच्या मृत्यूनंतर ज्याचा जन्मदिवस येतो त्या व्यक्तीची.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

**35. अमृता प्रीतमच्या शोधयात्रेत तिला मिळालेली अनमोल भेट कोणती ?**

अ. इमरोज

ब. संघर्षयुक्त सहवास

क. स्वयंपाक घरातील ओट्याजवळ उभं राहण्याची शिक्षा

ड. द्वेष करणारा प्रियकर

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ आणि ब बरोबर बाकी चूक

(2) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

**36. इमरोजच्या मते प्रेम म्हणजे काय ?**

अ. स्त्रीला शरीराच्या पलिकडे अस्तित्व नसणे

ब. तू मी विरघळून एक होणे आणि अहंकार गळून पडणे.

क. एकमेकांना समजून न घेणे.

ड. आपल्यातला 'मी' सतत जागा ठेवणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब बरोबर

(2) फक्त ब आणि ड बरोबर

(3) फक्त ब आणि क बरोबर

(4) फक्त ब बरोबर, अ, क, ड चूक

**37. उताऱ्याला योग्य शीर्षक कोणते ठरेल ?**

अ. समस्त विश्वातील प्रेमिक

ब. सर्जनशील सहजीवन

क. उत्कटतेचा अभाव

ड. अहंकार

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

**38. योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| क. | माशासारखे डोळे असणारी | i. | मृगाक्षी |
| ख. | हरिणासारखे डोळे असणारी | ii. | मिनाक्षी |
| ग. | डोळयांनी पहावयास समर्थ | iii. | मदिराक्षी |
| घ. | जिचे डोळे मदिरेप्रमाणे धुंद आहे अशी | iv. | डोळस |

**पर्यायी उत्तरे :**

| | (क) | (ख) | (ग) | (घ) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

**39. व्याकरण हे भाषाशुद्ध करणाऱ्या प्रयोजनाला बांधलेले आदेशात्मक शास्त्र आहे असे मत कोणत्या व्याकरणकाराने प्रथम मांडले ?**

(1) दादोबा पांडुरंग तर्खडकर

(2) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(3) रा.भि. गुंजीकर

(4) मोरो केशव दामले

**40. 'पंधरा ऑगस्टला <u>हिंदुस्थानाला</u> स्वातंत्र्य मिळाले.' अधोरेखित शब्दांची जाती ओळखा.**

(1) सर्वनाम (2) विशेषनाम

(3) दर्शकसर्वनाम (4) विशेषण

**41. येथे, तेथे, इकडे, तिकडे, वर, खाली इत्यादी शब्दारुपावरून कोणत्या अव्ययाचा बोध होतो ?**

अ. स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

ब. कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

क. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

ड. केवल प्रयोगी अव्यय

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**42. चित्रकार कुंचल्याने चित्र काढतो. विभक्तीचा अर्थ कोणता?**
(1) संबंध (2) करण
(3) कर्म (4) कर्ता

**43. 'रामा फार उतावळा आहे' या वाक्यातील 'उतावळा' या विशेषणाचे विशेषण ओळखा.**
(1) रामा (2) आहे
(3) फार (4) उतावळा

**44. शब्दांचे प्रथम लक्षात येणारे बाह्यरूप कोणते ?**
(1) अक्षररूप (2) अर्थरूप
(3) मूलवर्णरूप (4) चिन्हरूप

**45. अरेरे, ओहो, वा, शाबास, छे, शी इत्यादी शब्दारुपावरून कोणत्या अव्यय प्रकाराचा बोध होतो?**
अ. शब्दयोगी अव्यय
क. उभयान्वयी अव्यय
ब. केवल प्रयोगी अव्यय
ड. क्रियाविशेषणे अव्यय
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**46. पुढीलपैकी बरोबर विधान कोणते ते सांगा :**
अ. विशेषनामांना अनेकवचन नाही. परंतु विशिष्ट व्यक्तिबद्दल बहुमान किंवा आदर दर्शविण्यासाठी एकवचन वापरले जाते.
ब. मराठीत एकवचन, द्विवचन असे दोन वचने आहेत.
क. विशेषनाम विशेष व्यक्तिचे नाव असल्यामूळे दोन्ही वचनात येते.
ड. प्रतिष्ठावाचक बहुमानार्थी योजण्यात येणाऱ्या 'आ' कारान्त पुल्लींगी नामाचे अनेकवचन तेच राहते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ड बरोबर
(3) फक्त ब बरोबर (4) फक्त क बरोबर

**47. नामासर्वनामाचा संबंध वाक्यातील इतर पदांशी ज्या वर्णामार्फत जोडला जातो, त्याला काय म्हणतात ?**
(1) वचन (2) प्रत्यय
(3) विभक्ती (4) धातू

**48. 'जो काम करेल, तो यश मिळवील' या वाक्यातील 'जो' या सर्वनामाचा प्रकार ओळखा.**
(1) प्रश्नार्थक सर्वनाम
(2) दर्शक सर्वनाम
(3) संबंधी सर्वनाम
(4) पुरुषवाचक सर्वनाम

**49. म्हणून, सबब, करीता इत्यादी शब्दारुपावरून कोणत्या अव्यय प्रकाराचा बोध होतो ?**
अ. विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
ब. परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
क. न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
ड. समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय
**पर्यायी उत्तरे :**
(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**50. 'आपली पाठ आपल्याला दिसत नाही.' या म्हणीची समानार्थी म्हण**
(1) दोन डोळे शेजारी भेट नाही संसारी.
(2) दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसते पण आपल्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही.
(3) आपला हात जगन्नाथ.
(4) एका हाताने टाळी वाजत नाही.

**51. Identify the sentence/s punctuated correctly.**
a. The moon was bright; the fish were biting right;
b. and all together it was a glorious night.
c. Dr. Harish is a well-mannered man.
d. The Country Club is closed.
**Answer Options :**
(1) Only a and c (2) Only b and c
(3) Only c (4) Only a

**52. The word 'taciturn' is antonymous with .......**
a. clear
b. talkative
c. uncommunicative
d. speechless
**Answer Options :**
(1) Only d (2) Only b
(3) Only a and c (4) Only c

**53. Select the alternative in which the words are spelt correctly.**
(1) courageous, serviceable, perseverance, observatory
(2) beneficient, epidemic, homogeneous,

miscellaneous
(3) pauper, planetorium, visionary, catagorical
(4) suggestable, administrative, beverage, hideous

**54. Choose the nearest meaning of the underlined words.**
**The same contract, mutatis mutandis, will be given to each employee.**
(1) Printed on both sides of paper
(2) Folded in the middle of paper
(3) Making small changes that are necessary
(4) On A-4 size paper

**55. Point out the odd sentence.**
(1) Rainy season is mostly greeted by all the farmers in India.
(2) Seasonal railway tickets are not available now.
(3) One must eat the seasonal fruits to be healthy.
(4) Mohammad Ali was a seasoned boxer.

**56. She is the dullest girl in the class.**
Select the correct positive degree of the above.
(1) Very few girls in the class are as dull as she.
(2) She is a duller girl in the whole class.
(3) She is as dull as any other girl in the class.
(4) No other girl in the class is as dull as she.

**57. In the following sentence, some parts are printed in bold italics type. There are four choices. Find out which choice has the same meaning as the part in the sentence. which is in bold italics type. You can continue with the programme after I have left, said the guest.**
a. carry out b. carry off
c. carry away d. carry on
**Answer Options :**
(1) Only d (2) Only a
(3) Only a and b (4) Only b and c

**58. She was ....... ported with pleasure.**
Select the correct prefix to make the sentence meaningful.
(1) hy- (2) im-
(3) counter- (4) trans-

**59. Which is/are near to the meaning of underlined word? The track led them to a huddle of outbuildings.**
a. cluster b. crowd
c. lament
**Answer Options :**
(1) Only a (2) Only a and b
(3) Only b and c (4) a, b and c

**60. Point out the incorrect conditional.**
(1) If you eat excessively, more fat will accumulate under your skin.
(2) If you go to any picnic spot, you will only see the vacant hotels and deserted villages.
(3) If she does regular exercise, she would not be in poor health.
(4) If they had not mixed the industrial wastewater into the rivers, the water of rivers would have been rich in oxygen and crystal clear.

**61. We must go now, ....... .**
Add a correct question tag.
(1) are we ? (2) mustn't we?
(3) don't we? (4) must we ?

**62. Select appropriate synonym for the bold italics word in the following sentence.**
**I hate watching frightening movies.**
a. crying b. scary
c. harsh d. stormy
**Answer Options :**
(1) Only b and c (2) Only b
(3) Only a (4) Only d

**63. Identify the correct sentence/s.**
a. He cited his authorities.
b. He chose this sight for his building.
c. She hates the site of blood.
**Answer Options :**
(1) Only a (2) Only b
(3) Only b and c (4) Only a and c

**64. Fill in the blank with the appropriate option.**
**Police refused to ....... the identity of the suspect.**
(1) convulge (2) divulge
(3) convulse (4) divert

**65. Point out the sentences which have antonyms in them.**
a. Many freedom fighters were condemned to live in the prison cells and die there only.
b. We always praise her because she is blessed with two brilliant and beautiful daughters.
c. A large stork at last caught hold of a small frog and hastily gobbled it.
d. Many unpleasant dreams haunted him till he became a lunatic.
**Answer Options :**
(1) Only a and b (2) Only a and d
(3) Only a and c (4) Only b and c

**66. Spot the error in the following sentence. If no error say so.**

The Unique academy

For the last three days, I have been feeling
a b
out of sort. No error.
c d

**Answer Options :**

(1) a (2) b
(3) c (4) d

**67. What type of sentence is the following?**

When the old man was gone, God called Abraham and asked him where the stranger was.

a. Complex sentence
b. Compound sentence
c. Compound complex sentence
d. Simple sentence

**Answer Options :**

(1) Only a (2) Only d
(3) Only c and d (4) Only c

**68. Which one of the following prefixes meaning 'all' best suits the word 'scient' ?**

a. supra- b. super-
c. sur- d. omni-

**Answer Options :**

(1) Only d (2) Only b
(3) Only c (4) Only a

**69. Choose the nearest meaning of the underlined item.**

His father is an oncologist.

(1) One who studies pandemic.
(2) One who studies tumours in the body.
(3) One who is specialised in kidney diseases.
(4) One who studies loss of hair.

**70. Point out the incorrect sentence.**

(1) Many old mills and their grinders are now absolute.
(2) A person who hates mankind is a misanthrope.
(3) A thing or action that cannot be believed is incredible.
(4) A person who believes in fate is a fatalist.

**Read the following passage carefully and answer the questions from 71 to 75:**

Science has obviously multiplied the power of the war-makers. The weapons of the moment can kill more people more secretly and more unpleasantly than those of the past. This progress- as for want of another word I must call it this progress has been going on for some time. It has been said of each new weapon that it is so destructive and horrible that it will frighten people into their wits and force the nations to give up war for lack of cannon fodder. This hope has never been fulfilled, and I know no one who takes refuge in it today. The acts of men and women are not dictated by such simple compulsions and they themselves do not stand in any simple relation to the decision of the nations which they compromise. Grapeshot, TNT and gas have not helped to outlaw war and I see no sign that the hydrogen bomb or a whiff of bacteria will be more successful in making men wise by compulsion.

Secondly, science at the same time has given the nations quite new occasions for falling out. I do not mean such simple objectives as someone else's uranium mine or a Pacific Island which happens to be knee-deep in organic fertilizer. I do not mean merely another nation's factories and her skilled production. These are all parts of the surplus above our simple needs which gives our civilization the character and war in our times battens on this surplus. This is the object of the greed of nations and this also gives them the leisure to train and the means to arm for war. At bottom, we have remained individually too greedy to distribute our surplus and collectively too stupid to pile it up in any more useful form than the traditional mountains of arms. Science has created the surplus. Now put this year's budget beside the budget of 1750, anywhere in the world, and you will see what we are doing with it.

**71. The object of the greed of nations is to ....... .**

a. create the surplus by using science.
b. multiply the power of the war-makers.
c. compare the budget of 1750 and of this year.
d. grab the surplus of other nations.

**Answer Options :**

(1) Only b (2) Only d
(3) Only c (4) Only a

**72. Men will not be wise by ........ .**

a. distributing the surplus in the world
b. using the hydrogen bomb or a whiff of bacteria in war
c. giving up war for lack of cannon fodder
d. multiplying their war power

**Answer Options :**

(1) Only c (2) Only a
(3) Only b (4) Only d

**73. A feature of each new weapon is that it ...... .**

a. is created by science
b. frightens people into their wits
c. is dictated by men's compulsions
d. can kill people more secretly and more

unpleasantly

**Answer Options :**

(1) Only d (2) Only a
(3) Only c (4) Only b

**74. The hope which has never been fulfilled is that ......... .**

a. the progress in producing weapons will stop
b. the new weapon will force the nations to give up war
c. every nation will have the leisure to train and the means to arm for war
d. science will stop creating the surplus in the world

**Answer Options :**

(1) Only d (2) Only b
(3) Only c (4) Only a

**75. The most suitable title for this passage is ....... .**

a. Men and Warfare
b. Science and Progress
c. Science and War Weapons
d. The Greed of Nations and War Compulsions

**Answer Options :**

(1) Only d (2) Only c
(3) Only b (4) Only a

**76. Identify the correct sentence/s.**

a. The steak tastes badly.
b. The team played well.
c. Frank is happier than any man.

**Answer Options :**

(1) Only a (2) Only b
(3) Only a and b (4) Only b and c

**77. Choose the correct synonym for 'Obstinate' from the following:**

a. Detest b. Indolent
c. Obscure d. Stubborn

**Answer Options :**

(1) Only a and b (2) Only b and c
(3) Only c (4) Only d

**78. Which of the following word(s) best explain(s) the phrase counteract poison or disease?**

a. Antibiotic b. Antiseptic
c. Antidote d. Allopathy

**Answer Options :**

(1) Only c (2) Only a
(3) Both a and b (4) Only d

**79. Which of the following word(s) mean(s) the same as Firmament?**

a. Heavens b. Sky
c. Dainty

**Answer Options :**

(1) Only a (2) Only a and b
(3) Only b and c (4) a, b and c

**80. Point out the sentences that are without any prefixes.**

a. They played a good game at Chennai.
b. The child was fast asleep.
c. The whole world knows Hitler's brutal actions.
d. Shakespeare's dramas are famous all over the world.

**Answer Options :**

(1) Only a and c (2) Only a, c and d
(3) Only b (4) None of the above

**81. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 खाली नियुक्त आयोगाला कोणत्याही बाबीची चौकशी करताना व्यक्तींना समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडण्या करिता ........ चे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत.**

(1) लोक अदालत (3) दिवाणी न्यायालय
(2) सत्र न्यायालय (4) उच्च न्यायालय

➡ **The Commission appointed under the Maharashtra Right to Public Services Act, 2015 have same powers as are vested in ....... in respect of summoning and enforcing the attendance of person, while inquiring into any matter.**

(1) Lok Adalat (2) Sessions Court
(3) Civil Court (4) High Court

**82. माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत खालीलपैकी कोणत्या तरतूदी मध्ये दुरुस्ती अधिनियम, 2019 च्या द्वारे बदल करण्यात आले ?**

(1) माहिती आयुक्तांचे सेवा नियम व अटी
(2) केंद्रीय व राज्य माहिती आयोगाचे कार्यक्षेत्र
(3) माहिती ची व्याख्या
(4) जनमाहिती अधिकाऱ्याची कर्तव्ये

➡ **With respect to which of the following provisions under the Right to Information Act, 2005, the changes were brought in by Amendment Act, 2019 ?**

(1) Terms and Service Conditions of Information Commissioner
(2) Jurisdiction of Central and State Information Commission
(3) Definition of Information
(4) Duties of Public Information Officer

**83. माहिती अधिकार विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल त्याबाबतीत केंद्रीय किंवा राज्य जनमाहिती अधिकारी,**

**माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस ....... कळवील.**

अ. असा विनंतीचा अर्ज फेटाळण्याची कारणे

ब. अपील प्राधिकरणाचा तपशील

क. माहितीचा अधिकार नियमाची प्रत

ड. ज्या कालावधीत असा विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल तो कालावधी

**वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?**

(1) फक्त अ (2) फक्त ड

(3) फक्त अ, ब आणि ड (4) फक्त अ, ब आणि क

➨ **Where a request has been rejected for information, the Central or State Public Information Officer as the case may be, shall communicate to the person making the request ....... .**

a. the reason for such rejection

b. the particulars of the appellate authority

c. copy of Right to Information Rules

d. the period within which an appeal against such rejection may be preferred

**Which of the statement/s given above is/are correct?**

(1) Only a (2) Only d

(3) Only a, b and d (4) Only a, b and c

84. **माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 2 (झ) अन्वये 'अभिलेख' या संज्ञेत खालीलपैकी कशाचा समावेश होतो ?**

अ. कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल

ब. एखाद्या दस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म आणि प्रतिरूप प्रत

क. संगणकाद्वारे किंवा कोणत्याही उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही इतर साहित्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी सर्व

(2) फक्त अ आणि ब; पण क नाही

(3) फक्त अ आणि क; पण ब नाही

(4) फक्त ब आणि क; पण अ नाही

➨ **As per the Right to Information Act, 2005, 'record' as per Section 2 (i) includes which of the below ?**

a. Any document, manuscript and file.

b. Any microfilm and facsimile copy of document.

c. Any material produced by a computer or any other device.

**Answer Options :**

(1) All of the above

(2) Only a and b; but not c

(3) Only a and c; but not b

(4) Only b and c; but not a

85. **पुरेशा व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यात कसूर केल्यामुळे पदनिर्देशित अधिकाऱ्यावर लादण्यात आलेली शास्ती रक्कम जर त्याने भरली नाही, तर ही शास्ती रक्कम कुठून वसूल करण्यात येऊ शकते ?**

(1) बँकेतील शिल्लक

(2) वेतन

(3) मालमत्ता विक्री

(4) वरीलपैकी एकही नाही

➨ **If the penalty imposed on designated officer who has failed to provide public service without sufficient and reasonable cause is not paid, the amount of penalty can be recovered from which of the following heads?**

(1) Bank balance

(2) Salary

(3) Property sale

(4) None of the above

86. **....... या गुन्हयांच्या प्रकारामध्ये, फसवणूक करणारा व्यक्ती संवेदनशील वैयक्तिक आणि आर्थिक माहीती मिळविण्यासाठी टेलिफोन चा वापर करतो.**

(1) फिशींग (2) स्मिशिंग

(3) स्पॅमिंग (4) विशिंग

➨ **In ....... type of crime, the fraudster uses telephone to obtain sensitive personal and financial information.**

(1) phishing (2) smishing

(3) spamming (4) vishing

87. **ICMP प्रामुख्याने साठी वापरला जातो.**

(1) एरर रिपोर्टिंग (2) ड्रेसिंग

(3) फॉरवर्डिंग (4) राऊटींग

➨ **ICMP is primarily used for**

(1) error reporting (2) addressing

(3) forwarding (4) routing

88. **खालीलपैकी कोणती सेंट्रल आणि स्टेट ॲक्ट ची डिजिटल रिपॉसीटरी आहे ?**

(1) कोड ॲक्ट इंडीया

(2) आय.पी.सी.-डिजिटल

(3) इंडीया कोड

(4) वरीलपैकी नाही

➨ **Which one of the following is Digital Repository of All Central and State Acts?**

The UNIQUE academy

(1) Code Act India (2) IPC - Digital
(3) India Code (4) None of the above

89. **ज्ञान वाहिनीचे प्रत्येक नोडल सेंटर ....... या विद्यापीठा द्वारे विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक मीडीया उत्पादन केंद्र मधुन मीडीया उपलब्ध करून पुरविले जातात.**
(1) इंडीयन इन्स्टीटयुट ऑफ टेक्लोलॉजी, मद्रास
(2) कलकत्ता विद्यापीठ, कोलकाता
(3) मुंबई विद्यापीठ, मुंबई
(4) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (IGNOU), नवी दिल्ली

➨ **Each Nodal Centre for Gyan Vahini is provided with media from University's Electronic Media Production Centre.**
(1) Indian Institute of Technology, Madras
(2) University of Calcutta, Kolkata
(3) University of Mumbai, Mumbai
(4) Indira Gandhi National Open University (IGNOU), New Delhi

90. **एम–धन्वन्तरी आणि ....... हे प्रकल्प ग्रामीण भागातील आरोग्यावर आधारित आहेत.**
(1) सेहत– साथी (2) ई–आरोग्य
(3) आरोग्य सेवा (4) ग्रामीण सेवा

➨ **M-Dhanwantari and ........ are based on health care to rural communities.**
(1) Sehat-Sathi (2) e-Arogya
(3) Arogya Seva (4) Gramin Seva

91. **खालीलपैकी कोणत्या देशाचा 2021 च्या इन्स्टिटयूट फॉर इकॉनॉमिक्स अँड पीस, ऑस्ट्रेलिया ने तयार केलेल्या जागतिक शांतता निर्देशांकामध्ये प्रथम क्रमांक जाहीर झाला आहे ?**
(1) न्यूझिलंड (2) आईसलँड
(3) ऑस्ट्रीया (4) पोर्तुगाल

➨ **Which of the following countries holds first rank in the 2021 Global Peace Index prepared by Institute for Economics and Peace, Australia?**
(1) New Zealand (2) Iceland
(3) Austria (4) Portugal

92. **'ए स्ट्रेंजर ट्रुथ' हे पुस्तक ...... यांनी लिहीले आहे.**
(1) अशोक अॅलेक्झांडर (2) विक्रम सेठ
(3) मलाला युसुफझाई (4) अमिताव घोष

➨ **'A Stranger Truth' is a book written by ....... .**
(1) Ashok Alexander (2) Vikram Seth
(3) Malala Yousafzai (4) Amitav Ghosh

93. **'नव शैक्षणिक धोरण, 2020' संबंधी पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?**
अ. या धोरणाने अनिवार्य शाळेसाठीचा वयोगटाचा 6 – 14 वर्षे ऐवजी 3 – 18 वर्षे असा विस्तार केला आहे.
ब. वैद्यकीय आणि विधी शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षण संस्था वगळता सर्व उच्च शिक्षण संस्थांचे नियमन भारतीय उच्च शिक्षण आयोग ही एकमेव संस्था करेल.
क. कला आणि विज्ञान यात कडक/काटेकोर विभक्तीकरण असणार नाही.

**पर्याय उत्तरे :**
(1) अ, ब आणि क
(3) फक्त अ आणि क
(2) फक्त अ आणि ब
(4) फक्त ब आणि क

➨ **Which of the following statements are correct about the New Education Policy, 2020 ?**
a. It expands age group 6 - 14 years of mandatory schooling to 3 - 18 years of schooling.
b. Higher Education Commission of India will be a single regulator for higher education institutions exempting medical and legal education institutions.
c. There will be no rigid separations between arts and sciences.

**Answer Options :**
(1) a, b and c (2) Only a and b
(3) Only a and c (4) Only b and c

94. **'अपाचे' म्हणजे**
अ. वेब सर्व्हर सॉफ्टवेअर
ब. मोटारसायकल ब्रँड
क. अमेरिकेतील स्थानिक आदिवासी जमातीचे नाव
ड. सॉफ्टवेअर फाऊंडेशन

**वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/आहेत ?**
(1) फक्त अ बरोबर आहे
(2) फक्त अ आणि क बरोबर आहेत
(3) फक्त अ, ब आणि क बरोबर आहेत
(4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत

➨ **"Apache' is a**
a. Web server software
b. Motorcycle brand
c. Name of Native American tribe
d. Software foundation

**Which of the above statement/s is/are true?**
(1) Only a is correct
(2) Only a and e are correct
(3) Only a, b and care correct
(4) All the above statements are correct

95. **ऑगस्ट 2021 मधे युद्धग्रस्त अफगाणिस्तान मधून भारतीय नागरिकांची सुटका करण्यासाठी भारताने कोणती मोहिम राबवली ?**
(1) वंदे मातरम मोहिम
(2) देवी शक्ती मोहिम
(3) राहत मोहिम
(4) पायनापल एक्सप्रेस मोहिम

➡ **What is the name of the operation carried out by India to evacuate its citizens from war-torn Afghanistan in August 2021 ?**
(1) Operation Vande Mataram
(2) Operation Devi Shakti
(3) Operation Rahat
(4) Operation Pineapple Express

96. **ई– श्रम पोर्टल बद्दल पुढीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?**
अ. हे पोर्टल गृह खात्याने सुरू केले आहे.
ब. या पोर्टलवर नोंदणी सशुल्क असून त्यासाठीचे नाममात्र शुल्क फक्त 10 आहे.
क. हे पोर्टल असंघटित कामगारांच्या नोंदणीसाठी आहे.
ड. यावर नोंदणी केल्यानंतर अद्वितीय सार्वत्रिक खाते क्रमांक (UAN) असणारे ई–श्रम कार्ड देण्यात येणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**
(1) अ, ब, क आणि ड
(2) फक्त अ, ब आणि क
(3) फक्त क आणि ड
(4) फक्त अ, क आणि ड

➡ **Which of the following statements are true about E-Shram portal?**
a. It is launched by Home Ministry.
b. Registration on this portal is paid, nominal charge is 10.
c. It is a registration portal for unorganized workers.
d. E-Shram card with unique Universal Account Number (UAN) will be issued upon registration.

**Answer Options :**
(1) a, b, c and d
(2) Only a, b and c
(4) Only a, c and d
(3) Only c and d

97. **गेल ऑम्वेट यांनी पुढीलपैकी कोणती पुस्तके लिहिली आहेत ?**
अ. सिकींग बेगमपुरा
ब. बुद्धीझम इन इंडिया
क. वी शैल स्मॅश द प्रिझन
ड. रीइनव्हेंटींग रिव्होल्यूशन

**पर्यायी उत्तरे :**
(1) अ, ब, क आणि ड
(2) फक्त अ, ब आणि ड
(3) फक्त ब आणि ड
(4) फक्त अ आणि क

➡ **Which of the following books are written by Gail Omvedt ?**
a. Seeking Begumpura
b. Buddhism in India
c. We shall Smash the Prison
d. Reinventing Revolution

**Answer Options :**
(1) a, b, c and d
(2) Only a, b and d
(3) Only b and d
(4) Only a and c

98. **'इ–गोपाल' ॲप्लीकेशन काय आहे ?**
(1) कोविड 19च्या कालखंडात दहीहंडीचा पुरस्कार करणारे ॲप्लीकेशन आहे.
(2) मथुरा, वृंदावन, द्वारका या पर्यटन केंद्रांचा विकास करणारे ॲप्लीकेशन आहे.
(3) दुभत्या जनावरांची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी प्रत्यक्ष माहिती दुग्धउत्पादक शेतकऱ्यांना देण्यास भर देणारे ॲप्लीकेशन.
(4) दुभत्या जनावरांना आयुर्वेदिक औषधे पुरवण्यासाठीचे ॲप्लीकेशन.

➡ **What is 'e-GOPALA' application?**
(1) Application for promotion of Dahi handi during COVID-19 period.
(2) Application promoting development of Mathura, Vrindavan, Dwarka tourist centres.
(3) Application to promote real time information to dairy farmers for better productivity of dairy animals.
(4) Application about providing ayurvedic medicines to dairy animals.

99. **कुसुमाग्रज प्रतिष्ठान तर्फे दर दोन वर्षांनी दिला जाणारा जनस्थान पुरस्कार 2021 मध्ये ....... यांना देण्यात आला.**
(1) दिलीप चित्रे
(2) अरुण कोलाटकर
(3) मधु मंगेश कर्णिक

(4) वसंत आबाजी डहाके

➨ **The Janasthan Award 2021, given by the Kusumagraj Pratisthan after every two years, was given to**

(1) Dilip Chitre
(2) Arun Kolatkar
(3) Madhu Mangesh Karnik
(4) Vasant Abaji Dahake

---

**100. दर दिवशी 15 लाख कोविड लसीच्या मात्रा देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या मोहिमेचे नाव काय आहे ?**

(1) युवा स्वास्थ्य मोहिम
(2) संजीवनी मोहिम
(3) आयुष रक्षा मोहिम
(4) कवच कुंडल मोहिम

➨ **What is the name of Mission of Government of Maharashtra to administer 15 lakh COVID vaccines per day?**

(1) Mission Yuva Swasthya
(2) Mission Sanjeevani
(3) Mission Ayush Raksha
(4) Mission Kavach Kundal

The UNIQUE academy

# PSI-STI-ASO - मुख्य परीक्षा 2020 उत्तरे
# मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 1 | 3 | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 4 | 3 |
| 11 | 2 | 1 | 2 | 1 | 4 | 2 | 1 | 3 | 1 | 3 |
| 21 | 3 | 3 | 4 | 1 | 3 | 1 | 4 | 3 | 2 | 3 |
| 31 | 1 | 1 | 2 | 4 | 3 | 4 | 3 | 3 | 1 | 2 |
| 41 | 1 | 2 | 3 | 3 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 2 |
| 51 | 2 | 2 | 1 | 3 | 4 | 4 | 1 | 4 | 2 | 3 |
| 61 | 2 | 2 | 1 | 2 | 3 | 3 | 4 | 1 | 2 | 1 |
| 71 | 2 | 3 | # | 2 | 2 | 2 | 4 | 1 | 2 | 2 |
| 81 | 3 | 1 | 3 | 1 | 2 | 4 | 1 | 3 | # | 1 |
| 91 | 2 | 1 | 1 | 4 | 2 | 3 | 2 | 3 | 3 | 4 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.